**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ११**

दिनांक :- १५/०१/२०१४ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १५/०१/२०१४ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. पवार यमुनाताई रमणनाना सभापती
२. मा. नेटके सुमन राजेंद्र
३. मा. तरस बाळासाहेब जयवंत
४. मा. मोरेश्वर महादू भोंडवे
५. मा. भोंडवे संगिता राजेंद्र
६. मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
७. मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
८. मा. लोंढे गणेश नारायण
९. मा. शमीम पठाण
१०. मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव
११. मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
१२. मा. डोके अपर्णा निलेश
१३. मा. को-हाळे अनंत सुभाष
१४. मा. गावडे जयश्री वसंत
१५. मा. शेट्टी प्रसाद
१६. मा. मासुळकर समीर मोरेश्वर
१७ मा. पालांडे सुजाता सुनिल
१८. मा. पानसरे अमिना मोहंम्मद
१९. मा. मंचरकर गिता सुशिल
२०. मा. कदम कैलास महादेव
२१. मा. साबळे छाया जगन्नाथ
२२. मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव.
२३. मा. ओव्हाळ शेखर अशोक

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी सुभाष माछरे, मा. कार्य. अभियंता - रविंद्र दुधेकर – स्थापत्य, गोपाळराव चिंचवडे - विद्युत, वसंत काची -जलनि:सारण, प्रशासन अधिकारी - शांताराम राऊत, लेखाधिकारी - सुरेश आव्हाळे, उपअभियंता - डी. एन. गट्टूवार – जलनि:सारण, सी.बी. कोंडे, व्हि. जी कांबळे, एस.एम.कुदळे – स्थापत्य, व्ही.एन.देसले, श्री. संजय घुबे - पा.पु., एम.एम.चव्हाण, एस.एस. मोरे – विद्युत, डी. के. बैचे, आर.बी. चांदेरे – उद्यान, सहा. आरोग्याधिकारी, जे.एस. जानकर, कुलकर्णी एस.एस. इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक - मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव अनुमोदक - मा. शमीम पठाण

दलित पँथरचे संस्थापक प्रसिध्द कवि व साहित्यीक पद्मश्री नामदेव ढसाळ यांचे दु:खद निधन झाल्यामुळे त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

दि. १८/१२/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यत्रिका १० ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

**उपस्थित सन्मा सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. २. **तरतूद वर्ग करणेबाबत....**

ब प्रभाग कार्यालयाचे सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकात आरोग्य विभागाकडील स्थायी आस्थापना या लेखिर्षावर र.र. १९,००,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आली होती. सदर रक्कमेतून दि. ८/१/२०१४ अखेर १४,१८,७६,८६४/- इतकी रक्कम खर्च करणेत आलेली आहे. उर्वरित र. रु. ४,८१,२३,१३६/- एवढी शिल्लक आहे.

ब प्रभाग कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील “घंडागाडी ठेकेदार खर्च” या लेखिर्षावर सन २०१३-१४ करिता तरतूद र.रु. ७५,००,०००/- करणेत आली होती. दि. ९/१२/२०१३ अखेर ७१,९२,९६०/- असा खर्च झालेला आहे. सुधारित अंदाज पत्रकात सदर लेखाशिर्षावर ९३,००,०००/- अशी तरतूद सुचविणेत आलेली आहे. परंतू सुधारित अंदाजपत्रकातील तरतुदी बाबतची कार्यवाही असून त्याला बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात माहे डिसेंबर २०१३ चे घंडागाडी ठेकेदारांचे मानधन बिल अदा करणेकामी तरतुद कमी असल्याने सदर लेखा शिर्षावर तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. “घंडागाडी ठेकेदार खर्च” या लेखाशिर्षावर अंदाजे र.रु. १५,००,०००/- अक्षरी पंधरा लाख फक्त इतकी रक्कम आरोग्य विभागाकडील “स्थायी आस्थापना ”, या लेखाशिर्षावरुन वर्ग करणेत यावे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात बदली करावयाच्या रक्कमा नियमानुसार बदली करता येत असल्याने सदरचा विषयास मान्यता देणेबाबत.

विषय क्र. ३.स्वागत कमान करणेबाबत.

- प्र.क्र.१८ किवळे या ठिकाणी किवळे गांवठांणामध्ये दोन ब्रिज आहेत. नाल्याच्या भिंतीचे काम स्थापत्य विभागातर्फे चालू आहे. तरी दोन्ही ब्रिजचे साईडला दोन ‘ स्वागत कमान’ करणेबाबत.

विषय क्र. ४ प्र.क्र.१९ मधील रस्त्यांना नांव देणेबाबत.

- स्पाईन रोड ते संकल्प हॉटेल या रस्त्याला सिताराम दगडु चिंचवडे चौक असे नांव देणेबाबत.
- बिजलीनगर पाण्याची टाकी ते स्पाईन रोड या रस्त्याला रायबा चिंचवडे चौक असे नांव देणेबाबत.
- झुम इन हॉटेल ते वाल्हेकरवाडी पेट्रोल पंप या रस्त्याला नर्मदाबाई नानासाहेब भोंडवे चौक असे नांव देणेबाबत.
- किवळे स्मशानभूमीच्या रोडला कमान टाकून नागेश लक्ष्मणराव धुमाळ असे नांव देणेबाबत.

विषय क्र. ५. प्र. क्र. २३ मध्ये तसेच ब प्रभागामध्ये ब्लॉक ( पेव्हींग ) बसविण्यासाठीचे जे काम आहे त्यामध्ये कलर ( रंगीत ) ब्लॉक बसविणेबाबत.

विषय क्र.६. मोरया गोसावी क्रिडांगणाला शोभेची कमान टाकून, मोरया गोसावी महाराजांची मुर्तीची स्थापना त्या ठिकाणी करावी जेणेकरुन त्या क्रिडांगणाला दिलेल्या नांवाचा उद्देश ठळकपणे लक्षात येईल.

विषय क्र. ७. मोरया गोसावी क्रिडांगणामध्ये क्रिकेटचे मैदान, कब्बड्डीचे मैदान, खो-खो चे मैदान तसेच चालणेसाठी येणा-या नागरिकांना संरक्षणात्मक हिरव्या रंगाची जाळी (नेट) बसविणेबाबत.

विषय क्र.८. नवीन विस्तारित तालेरा रुग्णालयाला डॉ. रमाबाई आंबेडकर किंवा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नांव देणेबाबत.

विषय क्र. ९. आरक्षण क्र. २३० ब खेळाचे मैदान हे पोदार शाळेस करारानुसार दिलेले असून तो करार रद्द करुन ते क्रिडांगण नागरिकांसाठी खुले करणेबाबत.

विषय क्र. १०. कमी उत्पन्न गटासाठी (पाणी) नळ कनेक्शन सवलतिच्या दरात देणेबाबत.
शहरातील अनेक गरीब नागरिकांकडे नळ कनेक्शन नाही. नवीन नळ कनेक्शनसाठी सद्याची रक्कम ते भरु शकत नाहीत. अशा कमी उत्पन्न गटातील मागणी करणा-या नागरिकांना कमीत कमी खर्चात नळ कनेक्शन देणेबाबत.

विषय क्र. ११. नांमकरणाबाबत.
प्र.क्र.२१ दळवीनगर येथील स.नं. १६४, पौरुष हौसिंग सोसायटी व अवधूत हौसिंग सोसायटीच्या मधून जाणा-या श्री पंढरीनाथ दळवी यांचे घरापासून श्री भोर यांचे घरापर्यंतच्या रस्त्याला सिटी सर्व्हे व इतर शासकिय स्तरावर वहिवाट असलेले विनायक दळवीनगर हे नांव देणेबाबत तसेच सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेबाबत.

विषय क्र. १२. दळवीनगरमधील राज नॉव्हिजिस ते समर्थ कॉलनी रोड या मार्गाला अद्याप कोणतेही नामकरण केले नसून या मार्गाला कै. तुकाराम बाळा दळवी असे नामकरण करण्याबाबत.

------

ठराव क्र. ८२ विषय क्र. १
दि. १५/०१/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. लोंढे गणेश नारायण अनुमोदक : मा. शमीम पठाण
संदर्भ : मा. लोंढे गणेश नारायण यांचे दि. २०/१२/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

दळवीनगरमधील भागवती ट्रेडस् जवळील मार्गाला अद्याप कोणतेही नामकरण केले नसून या मार्गाला बळवंत दळवी (कॉर्नर) असे नांमकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ८३ विषय क्र. २
दि. १५/०१/२०१४ विभाग : आरोग्य विभाग ब प्रभाग
सुचक : मा. पानसरे अमिना मोहंम्मद अनुमोदक : मा. मंचरकर गिता सुशिल
संदर्भ : क्र.बप्र/७/कावि/१३/२०१४, दि.९/१/२०१४ चे पत्र.

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

**तरतूद वर्ग करणेबाबत....**

ब प्रभाग कार्यालयाचे सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकात आरोग्य विभागाकडील स्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर र.र. १९,००,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आली होती. सदर रक्कमेतून दि. ८/१/२०१४ अखेर १४,१८,७६,८६४/- इतकी रक्कम खर्च करणेत आलेली आहे. उर्वरित र. रु. ४,८१,२३,१३६/- एवढी शिल्लक आहे.

ब प्रभाग कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील "घंडागाडी ठेकेदार खर्च" या लेखाशिर्षावर सन २०१३-१४ करिता तरतूद र.रु. ७५,००,०००/- करणेत आली होती. दि. ९/१२/२०१३ अखेर ७१,९२,९६०/- असा खर्च झालेला आहे. सुधारित अंदाज पत्रकात सदर लेखाशिर्षावर ९३,००,०००/- अशी तरतूद सुचविणेत आलेली आहे. परंतू सुधारित अंदाजपत्रकातील तरतुदी बाबतची कार्यवाही असून त्याला बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात माहे डिसेंबर २०१३ चे घंडागाडी ठेकेदारांचे मानधन बिल अदा करणेकामी तरतूद कमी असल्याने सदर लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. "घंडागाडी ठेकेदार खर्च" या लेखाशिर्षावर अंदाजे र.रु. १५,००,०००/- अक्षरी पंधरा लाख फक्त इतकी रक्कम आरोग्य विभागाकडील "स्थायी आस्थापना ", या लेखा लेखाशिर्षावरुन वर्ग करणेत यावे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थ संकल्पीय लेखाशिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात बदली करावयाच्या रक्कमा नियमानुसार बदली करणेस व सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता कारवाई करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ८४ विषय क्र. ३
दि. १५/०१/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. तरस बाळासाहेब जयवंत अनुमोदक : मा. नेटके सुमन राजेंद्र
संदर्भ : मा. तरस बाळासाहेब जयवंत यांचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

स्वागत कमान करणेबाबत.

प्र.क्र.१८ किवळे या ठिकाणी किवळे गांवठांणामध्ये दोन ब्रिज आहेत. नाल्याच्या भिंतीचे काम स्थापत्य विभागातर्फे चालू आहे. तरी दोन्ही ब्रिजचे साईडला दोन ' स्वागत कमान' करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८५ विषय क्र. ४
दि. १५/०१/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. मोरेश्वर महादू भोंडवे अनुमोदक : मा. शमीम पठाण
संदर्भ : मा. मोरेश्वर महादू भोंडवे यांचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र.१९ मधील रस्त्यांना नांव देणेबाबत.

- स्पाईन रोड ते संकल्प हॉटेल या रस्त्याला सिताराम दगडु चिंचवडे चौक असे नांव देणेबाबत.
- बिजलीनगर पाण्याची टाकी ते स्पाईन रोड या रस्त्याला रायबा चिंचवडे चौक असे नांव देणेबाबत.
- झुम इन हॉटेल ते वाल्हेकरवाडी पेट्रोल पंप या रस्त्याला नर्मदाबाई नानासाहेब भोंडवे चौक असे नांव देणेबाबत.
- किवळे स्मशानभूमीच्या रोडला कमान टाकून नागेश लक्ष्मणराव धुमाळ.

वरीलप्रमाणे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ८६ विषय क्र. ५
दि. १५/०१/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक : मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव
संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्र.

प्र.क्र.२३ मध्ये तसेच ब प्रभागामध्ये ब्लॉक ( पेव्हींग ) बसविण्यासाठीचे जे कामआहे.

त्यामध्ये कलर ( रंगीत ) ब्लॉक बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ८७ विषय क्र. ६
दि. १५/०१/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक : मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव
संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्र.

मोरया गोसावी क्रिडांगणाला शोभेची कमान टाकून, मोरया गोसावी महाराजांची मुर्तीची स्थापना त्या ठिकाणी करावी जेणेकरुन त्या क्रिडांगणाला दिलेल्या नांवाचा उद्देश ठळकपणे लक्षात येईल सदरचे विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ८८ विषय क्र. ७
दि. १५/०१/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक : मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव
संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्र.

मोरया गोसावी क्रिडांगणामध्ये क्रिकेटचे मैदान, कब्बड्डीचे मैदान, खो - खो चे मैदान तसेच चालणेसाठी येणा-या नागरिकांना संरक्षणात्मक हिरव्या रंगाची जाळी (नेट) बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ८९ विषय क्र. ८
दि. १५/०१/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक : मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव
संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्र.

नवीन विस्तारित तालेरा रुग्णालयाला डॉ. रमाबाई आंबेडकर किंवा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ९० विषय क्र. ९
दि. १५/०१/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक : मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव
संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्र.

आरक्षण क्र. २३० ब खेळाचे मैदान हे पोदार शाळेस करारानुसार दिलेले असून तो करार रद्द करुन ते क्रिडांगण नागरिकांसाठी खुले करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ९१ विषय क्र. १०
दि. १५/०१/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव अनुमोदक : मा. शमीम पठाण
संदर्भ : मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव यांचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्र.

कमी उत्पन्न गटासाठी (पाणी) नळ कनेक्शन सवलतिच्या दरात देणेबाबत.

शहरातील अनेक गरीब नागरिकांकडे नळ कनेक्शन नाही. नवीन नळ कनेक्शनसाठी सद्याची रक्कम ते भरु शकत नाहीत. पाणी पुरवठा विभागाकडून अशा कमी उत्पन्न गटातील मागणी करणा-या नागरिकांना कमीत कमी खर्चात नळ कनेक्शन देणेबाबत प्रस्ताव ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ९२ विषय क्र. ११
दि. १५/०१/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. शमीम पठाण अनुमोदक : मा. नेटके सुमन राजेंद्र
संदर्भ : मा. शमीम पठाण यांचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्र.

नांमकरणाबाबत.

प्र.क्र.२१ दळवीनगर येथील स.नं. १६४, पौरुष हौसिंग सोसायटी व अवधूत हौसिंग सोसायटीच्या मधून जाणा-या श्री पंढरीनाथ दळवी यांचे घरापासून श्री भोर यांचे घरापर्यंतच्या रस्त्याला सिटी सर्व्हे व इतर शासकिय स्तरावर वहिवाट असलेले विनायक दळवीनगर हे नांव देणेस व सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ९३ विषय क्र. १२
दि. १५/०१/२०१४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. लोंढे गणेश नारायण अनुमोदक : मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
संदर्भ : मा. लोंढे गणेश नारायण यांचे दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

दळवीनगरमधील राज नॉव्हेजिस ते समर्थ कॉलनी रोड या मार्गाला अद्याप कोणतेही नामकरण केले नसून या मार्गाला कै. तुकाराम बाळा दळवी असे नांमकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

यानंतर मा. अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(पवार यमुनाताई रमणनाना)
अध्यक्षा
ब प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/१७/२०१४
दि. २१/०१/२०१४.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.